

संतोपदेश...

जो अचूक
अंतःकरणाने
करतो साध
अध्यात्मात
प्रगल्भ होतो.

# श्रीगुरुचरित्र

## शोध आणि बोध

-बापट गुरुजी



'श्रीगुरुचरित्र' ह्या प्राकृत भाषेतल्या प्रासादिक ग्रंथाला दत्तसंप्रदायात आणि एकंदरच सर्व गुरुसंप्रदायांत अत्यंत श्रद्धेचं असं उच्च स्थान दिलं गेलं आहे. ह्या ग्रंथाच्या नित्यपठणाचा किंवा सप्ताहवाचनाचा परिपाठ अनेक दत्तभक्तांमध्ये पाळला जातो. हे पठण अधिक प्रभावी होण्याकरिता ह्या प्रासादिक ग्रंथाची निर्मिती कोणी आणि कशासाठी केली, त्यात कोणतं मंत्रसामर्थ्य दडलं आहे, त्याचं पठण नेमका कोणता हेतू ठेवून करावं याचं ज्ञान ग्रंथपठण करणाऱ्या प्रत्येकाला असायला हवं. कारण ज्ञानोत्तर निर्माण होणारी श्रद्धा अधिक श्रेष्ठ आणि बलवान असते आणि अशा दृढ श्रद्धेसहित केलेल्या पठणातून अधिक शक्तिनिर्मिती होत असते.

कोणत्याही साहित्यकृतीची जी सहा अंगे सांगितली जातात, त्यामध्ये महत्त्वाचा असतो तो उपक्रम. उपक्रम म्हणजे ती साहित्यकृती कशासाठी निर्माण झाली, त्यामागचा उद्देश काय, लोकांनी त्या रचनेतून काय बोध घ्यावा याविषयीचं भाष्य ग्रंथकाराने ग्रंथारंभीच केलेलं असतं. त्या भाष्यालाच उपक्रम म्हणतात. श्रीगुरुचरित्रात त्याचा उहापोह अप्रत्यक्षरित्या ग्रंथकर्त्याने केला आहे. नामधारक नावाचा एक भक्त सिद्ध नावाच्या सत्पुरुषाच्या सान्निध्यात आला. ह्या सिद्धाकडून त्या नामधारकाला जो मार्गदर्शन मिळालं ते त्याला त्याच्या स्वतःच्या आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरलं. हे मार्गदर्शन जर लोकांनाही मिळालं तर त्यांनाही किंबहुना संपूर्ण समाजालाच त्याचा फायदा होईल, ह्या लोकोपकाराच्या हेतूने हा ग्रंथ निर्माण झाला. त्याचा शोध घेण्यासाठी श्रीगुरुचरित्राच्या मूळ इतिहासाकडे वळावं लागेल, कारण इतिहासाचं अवलोकन केल्याशिवाय ग्रंथशोधाची आणि पर्यायाने आत्मशोधनाची प्रक्रिया पूर्ण होणार नाही.

**ग्रंथ इतिहास :**

'नामधारक म्हणे सिद्धासी' असा उल्लेख या ग्रंथात वारंवार येतो. दत्तसंप्रदायात हा सिद्ध नामक सत्पुरुष कोण होऊन गेला, या प्रश्नाचं उत्तर चौदाव्या शतकात होऊन गेलेल्या श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी महाराज या श्रेष्ठ दत्तावतारी महापुरुषाच्या चरित्रामध्ये सापडलं. श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे अत्यंत जवळचे असे सात शिष्य होऊन गेले; माधवसरस्वती, बाळसरस्वती, कृष्णसरस्वती, उपेंद्रसरस्वती, सदानंदसरस्वती, ज्ञानज्योतिसरस्वती आणि सिद्धसरस्वती. ह्या संन्यासी शिष्यांपैकी फक्त एक शिष्य शेवटपर्यंत त्यांच्या बरोबर होते ते म्हणजे सिद्धसरस्वती होत. श्रीशैल्य पर्वताजवळील कर्दळीवनातल्या निजानंदगमनाच्या प्रसंगी श्रीगुरुंनी काही प्रासादिक फुलं प्रवाहातून विरुद्ध दिशेला आपल्या चार प्रमुख शिष्यांकडे पाठविली, त्यापैकी सिद्धसरस्वती होते असा उल्लेख श्रीगुरुचरित्रात आढळतो. श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा हा लाडका शिष्य 'सिद्ध' त्यांच्यापेक्षा वयाने खूप लहान होता असं जरी गृहीत धरलं तरी इतिहास संशोधकांच्या मताप्रमाणे ह्या सिद्धाने नामधारकाला संपूर्ण चरित्रकथा स्वतः सांगितली हे विधान संयुक्तिक नाही. कारण श्रीगुरुचरित्र निर्मितीचा काळ पाहता सिद्ध नामक सत्पुरुषाने नामधारक भक्ताला प्रत्यक्ष मार्गदर्शन करणं ही गोष्ट भौतिक सृष्टीच्या मर्यादा लक्षात घेता शक्यतेला धरून नाही.

मग दोनच गोष्टींची शक्यता शिल्लक राहते. एक म्हणजे हे मार्गदर्शन अप्रत्यक्षरीत्या ध्यानावस्थेत किंवा स्वप्नावस्थेत घडलं असावं किंवा सिद्धांनी जे मार्गदर्शन केलं ते कोणत्यातरी स्वरूपात नामधारकाकडे उपलब्ध झालं. ह्या पार्श्वभूमीवर 'नामधारक' ह्याचा विचार आवश्यक ठरतो. श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी

महाराजांचा 'सायंदेव' नावाचा एक शिष्य होता. ह्या सायंदेवाला सिद्धसरस्वतींकडून काही गोष्टी प्राप्त झाल्या. त्या गोष्टी संस्कृत भाषेतली हस्तलिखितं या स्वरूपात असाव्यात किंवा सिद्धांनी मौखिकरित्या जे सांगितलं ते सायंदेवाने लिहून घेतलं असावं, नक्की काय घडलं याची नोंद इतिहासात सापडत नाही.

हे वाङ्मय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वंशपरंपरागत रीतीने सायंदेवाच्या पुढच्या पिढ्यांकडे गेलं असावं. सायंदेवाच्या पाचव्या पिढीला वंशज म्हणजे 'सरस्वती गंगाधर' अर्थात् श्रीगुरुचरित्राचा लेखक. हाच नामधारक होय. हे वंशपरंपरागत आलेलं वाङ्मय नामधारकाच्या घरात वाचलं जात असेल किंवा त्याचे पूजेअर्चेसारखे विधी संपन्न होत असतील, काही माहीत नाही. परंतु हे चरित्र लोकमानसातही विस्तारावं ह्या हेतूने सामान्य भक्ताच्या प्रातिनिधिक रूपात नामधारकाला निमित्त करून, भक्ताच्या मनात वारंवार उद्‌भवणाऱ्या चिंतांचं, संदेहाचं, दैन्याचं निराकरण कसं होईल, हा उपक्रम मनाशी घेऊन तशी पृच्छा नामधारकाने सिद्धांकडे केली असावी. त्याचं उत्तर म्हणून नामधारकाकडून प्राकृत भाषेत पुढच्या संपूर्ण बावन्न अध्यायांची प्रासादिक स्वरूपाची रचना झाली. हीच श्रीगुरुचरित्राची मराठी भाषेतील मूळ प्रत होय.

श्रीगुरुचरित्राची निर्मिती श्रीगुरुंच्या निजानंदगमनानंतर सुमारे शंभर वर्षांनी झाली असावी असं इतिहासकार मानतात. श्रीगुरुचरित्राचा अगदी अर्वाचीन काळातला इतिहास बघितला तर तो थोडासा गंभीर स्वरूपाचा आहे. असं म्हणतात की श्रीगुरुचरित्राची मूळ प्रत सायंदेवाच्या मूळ कडगंची गावामध्ये सन १९२० सालापर्यंत उपलब्ध होती. मात्र त्यानंतर अनाकलनीय पद्धतीने कोणीतरी ती प्रत नष्ट केली. इतिहासाची पाने जपून ठेवण्याबाबत एकंदरच समाजाची अनास्था असल्याने प्रत्यक्ष श्रीगुरुचरित्र ग्रंथ आणि त्याचे दोन चरित्रनायक अर्थात् श्रीपादश्रीवल्लभ आणि श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी महाराज यांच्या जन्मकाळाबाबत इतिहासकारांत एकवाक्यता नाही.

श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या निजानंदगमनानंतर सुमारे ५८० ते ६०० वर्षांनी त्यांची कारंजा येथील जन्मभूमी देखील श्रीगुरुचरित्राचं संस्कृत भाषांतर असणाऱ्या 'सप्तश्लोकी'चे कर्ते दत्तावतारी प.प. वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज यांनी दाखवून दिली, असं त्यांच्या चरित्रकारांनी नमूद केलं आहे. श्रीमन् नरसिंह सरस्वतींचा जन्म जेथे झाला त्या त्यांच्या वडिलोपार्जित वाड्यात अनेक लोकांना वेदमंत्रघोष इ. सारखे चित्र-विचित्र अनुभव आल्यामुळं तो वाडा भुतांचा वाडा म्हणून प्रसिद्ध झाला होता. स्वामी महाराजांनी त्या वाड्यात एक रात्र वास्तव्य केलं, आपल्या प्रातिभ ज्ञानाने श्रीगुरुंचं जन्मस्थळ जाणून घेतलं आणि त्यांनी भुताच्या भीतीने पछाडलेल्या स्थानिक लोकांना सांगितलं की,'ही एक अतिशय पवित्र वास्तू असून हे श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचं जन्मस्थान आहे. इथे मंदिर बांधा आणि या वास्तूमध्ये नियमितपणे पूजा-अर्चा वगैरे सत्कर्म करा.'

साधारण हाच प्रकार श्रीपादश्रीवल्लभ यांच्या पीठापूर ह्या जन्मस्थानाबाबत घडला. ती जागासुद्धा टेंबे स्वामी महाराजांनी दत्तभक्तांना दाखवून दिल्याचं आढळतं. सांप्रत वाचनात असलेली श्रीगुरुचरित्राची प्रत म्हणजे 'रामचंद्र कृष्ण कामत' या विद्वान गृहस्थाने काही हस्तलिखित प्रतींचा कष्टपूर्वक अभ्यास करून पुनर्लेखनाने शुद्ध केलेली प्रत आहे.

**गुरुचरित्र बोध :**

श्रीगुरुचरित्र या ग्रंथा जसा आध्यात्मिक उपदेश आहे, तसंच कर्मकांडाचं, वर्णाश्रमधर्माचं, यज्ञ-यागाचंही विवरण आहे. थोडक्यात जीवनाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये माणसानं कसं वागावं याचं मार्गदर्शन करण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न आहे. खरंतर श्रीगुरुचरित्राच्या संपूर्ण बावन्न अध्यायांमध्ये आध्यात्मिक मार्गदर्शनापेक्षाही व्यावहारिक मार्गदर्शन जास्त प्रमाणात केलेलं आढळतं. अर्थात् आध्यात्मिक दृष्टया वाचन करणाऱ्या भक्ताला त्यातूनही शब्दातीत (inbetween the llines) असा आध्यात्मिक अर्थ घेता येतो. नामधारक अर्थात सरस्वती गंगाधराचा सिद्धांना मूळ प्रश्न होता की,'एवढ्या पिढ्या आमच्याकडे गुरूपूजा केली जाते तरी आमच्या द्वारी हे दैन्य का, आमच्या मनी हे कष्ट का?' त्या एका प्रश्नाचे उत्तर सिद्धांनी अतिशय समर्पकतेने दिले आहे.

गुरूकृपा होय ज्यास। दैन्य दिसे कैचें त्यास।
समस्त देव त्यासी वश्य। कळिकाळासी जिंके नर।।
ऐसी वस्तू पूजूनी। दैन्यवृत्ति सांगसी ज्ञणी।
नसेल दृढ तुझे मनी। म्हणोनि कष्ट भोगितोसी।।

-श्रीगुरुचरित्र २/२१-२२

आपल्या वचनाच्या पुष्ट्यर्थ सिद्धांनी त्याला अनेक गोष्टी सांगितल्या, तोच श्रीगुरुचरित्राचा विस्तार होय. जसं,'म्हशीचं दूध काढ' असं श्रीगुरूंनी सांगितल्याबरोबर शिष्याने कोणताही संशय मनात न आणता आपली वांझ म्हैस दोहायला सुरूवात केली आणि चक्क भाकड म्हशीला पान्हा फुटला! रोज नमनासाठी पायावर डोकं ठेवणाऱ्या शेतकऱ्याला सांगितलं की,'तुझं उभं शेत कापून टाक.' त्या शेतकऱ्याने कोणाच्याही विरोधाला न जुमानता तसं केल्यावर

गावावरील अतिवृष्टीनंतरही त्याच्या अर्धवट कापलेल्या शेतातूनच पुढे त्याला कित्येक पट अधिक धान्य मिळालं. अशा चमत्कार सदृश्य वाटणाऱ्या सर्व घटनांमधून साधकाने एक महत्त्वाचा बोध घेणं आवश्यक आहे, तो म्हणजे या गोष्टींमधून वारंवार अधोरेखित होणारं गुरुआज्ञापालनाचं अनन्यसाधारण महत्त्व! ह्या प्रत्येक गोष्टीत प्रखर विरोध सहन करूनही शिष्याकडून गुरुआज्ञेचं तंतोतंत पालन झालं ज्यामुळे कर्मनियमांतून मार्ग काढत चमत्कारसदृश्य प्राप्ती सद्गुरुतत्त्वाकडून त्याला घडली.

वस्तुत: गुरुभक्तीचं सत्कर्म करत असताना प्रत्येक भक्ताला विरोध सहन करावाच लागतो. 'हा त्या अमक्या स्थानावर जातो ते त्याचा वेळ जात नाही म्हणून' किंवा 'त्याला तिथे नक्की काहीतरी मिळत असेल' असे नानाप्रकारचे आरोप त्या भक्तावर होत असतात. तो सगळा विरोध डावलून जो अचूक आज्ञापालन करतो तोच अध्यात्मात यशस्वी होतो. नेमका हाच बोध सिद्धांनी नामधारकाला वेगवेगळे दृष्टांत देऊन सांगितला आहे. भक्ती करत असूनही नि:संदेह निष्ठा साधता न आल्याने भक्त दैन्यवाणाच राहतो हे जेव्हा 'नामधारका'च्या लक्षात आलं असेल, तेव्हा इतरांकडून ही चूक होऊ नये, पुढची पिढी सावध व्हावी म्हणून त्याने त्या सगळ्या कथा प्राकृत भाषेत श्रीगुरुचरित्राच्या रूपात लिहून ठेवल्या असतील असं मानायला हरकत नाही. दुर्दैवाने पुढीच पिढी खरंच सावध झाली का हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे! आजही श्रीगुरुचरित्राची अनेक पारायणं होतात. नियमितपणे रोजच्या रोज श्रीगुरुचरित्राचं वाचन करणारेही अनेक लोक आहेत. परंतु त्यातलं खरोखरचं तात्पर्य किती जण उचलतात याचं ज्याने त्याने प्रामाणिक आत्मशोधन करणं गरजेचं आहे. गुरुचरित्राचं एकाग्रतापूर्वक वाचन आणि चिंतन जे करतील त्यांना हा बोध झाल्यावाचून निश्चितपणे राहणार नाही.

जे जे गुरुचरित्र वाचतील त्यांना काय काय प्राप्त होईल हे ग्रंथकाराने ग्रंथातच विशद केलं आहे. प्रत्येक अध्यायाची फलश्रुती सांगितली गेली आहे. या फलश्रुतीमध्ये बहुतांशी सगळ्या प्रापंचिक हिताच्या गोष्टी सांगितल्या आहेत, आध्यात्मिक हिताची केवळ एखादडुसरीच गोष्ट त्यात असेल. परंतु समाजाच्या प्रत्येक स्तरातल्या व्यक्तीला त्याच्या जीवनातल्या प्रत्येक पायरीवर ज्या ज्या इच्छा होऊ शकतात ती प्रत्येक इच्छा पूर्ण करण्याचा सोपा मार्ग श्रीगुरुचरित्रात सांगितला आहे. धन, ऐश्वर्य, संपत्ती यासारखी भौतिक जीवनातली फलश्रुती इतरही अनेक प्राचीन स्तोत्रांमध्ये, मंत्रांमध्येही सांगितलेली असते. वाचणाऱ्याची, पठण करणाऱ्याची तेवढी प्रखर इच्छा असेल तर ते सहज साध्य होतं सुद्धा. यात चमत्काराचा काहीच भाग नसतो.

एकाग्रतापूर्वक केलेल्या प्रत्येक पठणाद्वारे आपण वातावरणात शुभलहरी निर्माण करतो. या लहरी आपल्याला मदत करतात. आपल्या इच्छापूर्तींच्या आड येणाऱ्या दूषित कर्मांना सम (न्युट्रलाईज) करण्याची शक्ती या शुभ स्पंदनांमध्ये असते. ज्या भक्तांची भक्ती, प्रेम, श्रद्धा अत्युच्च कोटीवर जाईल त्या त्या प्रमाणात अतिशय उच्च कोटींची कंपनं वातावरणात निर्माण होतात ही वस्तुस्थिती आहे. सारांशाने शंभर टक्के नि:संदेह गुरु आज्ञापालनाचा बोध देणारा एकमेव ग्रंथ म्हणजे श्रीगुरुचरित्र! इतरही काही ग्रंथांमध्ये ही गोष्ट सांगितली असेल, पण श्रीगुरुचरित्रातल्या प्रत्येक अध्यायात सुरुवातीला आणि शेवटी हा एकच मुद्दा प्रकर्षाने अधोरेखित केला आहे की.'अरे, काही करू नकोस. तुझ्या सद्गुरुंना शरण जा. तुझी श्रद्धा, तुझी भक्ती, तुझी एकाग्रता एवढी वाढव की त्या सद्गुरुंनी सांगितलेला प्रत्येक शब्द तुला अलगद फुलासारखा झेलता आला पाहिजे. कदाचित त्या फुलात काही काटे असतील जे तुला टोचतील. तरी सुद्धा तू तक्रार करू नकोस, कारण ते काटेसुद्धा तुझ्या अंतिम हिताकरिताच असतील.' हा अर्थ श्रीगुरुचरित्रातल्या प्रत्येक अध्यायामध्ये निरनिराळ्या शब्दांद्वारे प्रतिबिंबित झाला आहे, जो पठण करताना आपल्याला समजावून घेता आला पाहिजे.

कोणत्याही मंत्राचे, शब्द समुच्चयाचे शुभपरिणाम अजून एका गोष्टीवर अवलंबून असतात, ती म्हणजे त्या ग्रंथातून व्यक्त झालेले शुभाशीर्वाद. एकाग्रतेने, श्रद्धेने जो कोणी या ग्रंथाचे पठण किंवा श्रवण करेल त्याची अमुक अमुक कामं सिद्धीस जातील.' असा आशीर्वादपर मजकूर प्रत्येक धार्मिक ग्रंथात सामावलेला असतो. ज्या चरित्रनायकाची स्तुती त्या ग्रंथामध्ये केलेली असते, त्या चरित्रनायकाचे आशीर्वाद बहुमोल असतात. ती विशिष्ट स्तुतीपर रचना एकाग्रतेने, श्रद्धेने पठण करणाऱ्याला ते आशीर्वाद आपोआप प्राप्त होतात हा अध्यात्मातला नियम आहे. श्रीगुरुचरित्राचाच विचार केला तर यात दोन चरित्रनायक आहेत. श्रीपादश्रीवल्लभ या दत्तावतारी सत्पुरुषाचे लीलाचरित्र काही अध्यायांमध्ये सांगून त्यानंतर उरलेले सर्व अध्याय श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांवर रचलेले आहेत. म्हणजेच श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ या दोन दत्तावतारी महापुरुषांचं चरित्रवर्णन करणारा स्तुतीपर ग्रंथ आहे.

आपणही दैनंदिन जीवनात अशी स्तुती वारंवार करत असतो. नोकर मालकाची स्तुती करतो, कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्याची स्तुती करतो. व्यावहारिक जगातल्या ह्या स्तुतीमागे ज्याची

स्तुती केली जाते, त्याने आपल्याला काही त्रास देऊ नये असा स्वार्थी हेतूच बहुतेक वेळेला असतो. परम असा अर्थ प्राप्त करून देणाऱ्या परमार्थात मात्र अशी संकुचित स्वार्थासाठी केलेली स्तुती अपेक्षित नसते. इंग्रजी मध्ये स्तुती या शब्दाला समानार्थी दोन शब्द आहेत; एक 'फ्लॅटरी' आणि दुसरा 'ॲप्रिसियेशन'. यातलं ॲप्रिसियेशन म्हणजे प्रांजळ स्तुती. भक्ताने प्रांजळ स्तुती जरूर करावी परंतु भीतीपोटी अथवा क्षुद्र स्वार्थासाठी श्रीगुरुचरित्राचं वाचन कधीही करू नये, कारण त्याचं फळ अशाश्वत असतं. खऱ्या भक्ताने अशाश्वत फळ नाकारून शाश्वत फळाची अपेक्षा केली पाहिजे.

श्रीगुरुचरित्राचं पठण करणाऱ्या प्रत्येकाने आत्मशोधन करावं की आपण नेमकं कशासाठी हे पठण करतो आहोत? आपला नेमका हेतू काय आहे? तो शाश्वत आणि भव्य स्वरूपाचा आहे की अशाश्वत संकुचित आहे? हे आत्मशोधन प्रत्येक श्रीगुरुचरित्र पठणाआधी भक्त करू शकला तर श्रीगुरुचरित्र पठणातून त्याला त्याच्या प्रगतीचा मार्ग आपोआप सापडत जाईल, नव्हे, सद्गुरुतत्त्वाकडून तशी काळजी घेतली जाईल हे निश्चित.

**वाङ्मयीन मूल्ये :**

साहित्यिक दृष्ट्या श्रीगुरुचरित्राचा विचार केला, तरी त्यात अनेक उत्तम वैशिष्ट्य आढळतात. यातली भाषा साधारण पंधराव्या-सोळाव्या शतकातील साधी, सोपी, रसाळ अशी आहे. साहित्यातला शृंगार हा रस सोडून इतर सर्व रसांची त्यात अनुभूती आहे. यातल्या प्रत्येक ओवीत उत्तम अलंकार, उत्तम अनुप्रास, उत्तम यमक जुळलेलं आहे. कौतुकाची बाब म्हणजे श्रीगुरुचरित्र रचनाकार सरस्वती गंगाधराची मातृभाषा मराठी नसून कानडी होती. अवघड गोष्ट आहे ही! मातृभाषा कानडी असताना मराठी भाषेत इतक्या उत्तम दर्जाचा प्रासादिक ग्रंथ लिहिणं, त्याद्वारे चरित्रनायकांचे आशीर्वाद समाजापर्यंत पोहोचवणं आणि त्यात यशस्वी होणं हे अचाट कार्य आहे. या ग्रंथाची आजची लोकप्रियता बघता रचनाकार या ग्रंथाला समाजातल्या सर्व स्तरापर्यंत पोहोचवण्यात यशस्वी झाला हे निश्चित आहे.

**सामूहिक साधना :**

श्रीगुरुचरित्रामध्ये सामर्थ्य आहे आणि ह्याचे पठण केल्यामुळे अनेक जणांच्या जीवनातल्या अडचणी दूर झाल्याच्या कथा प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज आपल्या शिष्यांना सांगत असत असा उल्लेख त्यांच्या चरित्रात आढळतो. अर्थात् स्वामी महाराजांनी पुढे हे सुद्धा स्पष्ट केलं आहे की असं यश त्या त्या व्यक्तीच्या कर्मदशेवर अवलंबून असतं. इतर कोणत्याही सामुदायिक साधनेप्रमाणेच सामुदायिक श्रीगुरुचरित्र पठणामध्येदेखील वर्णाश्रमाने विहित नियमावली शिथील होत असते. वस्तुत: मूळ श्रीगुरुचरित्रात वर्णाश्रम धर्माचा उल्लेख अनेक ठिकाणी आला असला तरी हा ग्रंथ कोणी वाचावा किंवा कोणी वाचू नये या संदर्भातल्या कोणत्याही सोवळ्या-ओवळ्याच्या अटींचा उल्लेख त्यात नाही. किंबहुना श्रीगुरुचरित्रातल्या अवतरणिकेत असा उल्लेख आहे,'अंत:करण असता पवित्र। नित्य वाचावे गुरुचरित्र." शुद्ध अंत:करण हेच जणू तेथे सोवळे मानले गेले आहे.

जसजसा वैयक्तिक लाभाकरीता श्रीगुरुचरित्राची पारायणं करण्याचा प्रघात पडला तसतसे पारायणाचे नियम अधिकाधिक कडक होत गेले. एकत्र पठणामध्ये मात्र वैयक्तिक पठणापेक्षा अधिक व्यापक आणि भव्य हेतू असतो. त्यामुळे एकत्रित पठण करत असताना नियमावलीबाबत घडलेल्या चुका त्या व्यक्तीला बाधण्याची शक्यता नसते. याचं कारण उच्च हेतूने केलेल्या एकत्रित साधनेमध्ये निर्माण होणाऱ्या प्रचंड शक्तीमुळे हे आचारदोष सम (न्युट्रलाईज) होतात.

**पादुका माहात्म्य :**

श्रीगुरुचरित्राचे मूळ चरित्रनायक म्हणजे श्रीपादश्रीवल्लभ. त्यांच्या चरित्राविषयी फारशी माहिती उपलब्ध नसली तरी त्यांचा काळ साधारण चौदाव्या शतकातला पूर्वार्ध असावा. या काळात भारतवर्षात सर्वत्र मुसलमान सत्तेचं अधिक्रमण सुरू होतं आणि अनन्वित छळाचा, बळाचा वापर करून कित्येक हिंदू मंदिरांची तोडफोड होऊन मूर्तीभंजनाच्या घटना घडल्या असं इतिहास सांगतो. या काळात सनातन वैदिक धर्माची मूलतत्त्वं सुरक्षित ठेवण्याचं महत्त्वाचं कार्य दत्तसंप्रदायातल्या सत्पुरुषांनी केलं. पवित्र स्थळांचं पावित्र्य राखण्याच्या हेतूने त्यावेळच्या सत्पुरुषांनी सांगितलेलला मार्ग म्हणजे अशा स्थानांवर मूर्तीऐवजी पादुकांची स्थापना करून 'नम: गुरुपादुकाभ्यो नम:' या मंत्राचा उद्घोष करणे. केवळ तीस वर्षांचं जीवन कार्य असणाऱ्या श्रीपादश्रीवल्लभांनंतर श्रीमन् नरसिंह सरस्वती स्वामींनी गुरुपादुका माहात्म्य अधिक वाढवलं, त्यांनी तीन ठिकाणी निर्गुण पादुकांची प्रतिष्ठापना केली. अशा प्रयत्नांमुळेच बहुधा मूर्तीभंजनाच्या पार्श्वभूमीवरही पादुका स्थानांची विटंबना करण्याचे प्रसंग फारसे घडले नाहीत. याशिवाय मुस्लिम सत्ताधीशांनाही आपल्या कृपाछत्राखाली घेऊन त्यांच्याद्वारे धर्मरक्षण घडवण्याचं फार मोठं कौशल्य त्या काळात दत्तसंप्रदायाने दाखवलं. श्रीगुरुचरित्रातली रजकाची कथा या विधानाला पुष्टी देते.

नाथसंप्रदायातली समाधी स्थळंही दर्गेसदृश्य असतात. त्यामागेही नेमकी हीच कारणं आहेत. आक्रमण काळात धर्मसंरक्षणाचे वेगवेगळे कौशल्यपूर्ण मार्ग जिथे जिथे अवलंबिले गेले नाहीत तेथे हिंदुधर्मीय राजसत्ता सुद्धा नष्ट झाली.

सारांशाने त्या काळात अत्यंत अभ्यासपूर्ण असा पादुका माहात्म्याचा प्रसार केला गेला ज्यामुळे पादुका पूजनाची प्रथा आपल्या संस्कृतीमध्ये रुजली. पादुका पूजनाची ही यशस्विता समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवण्याचं मोठं श्रेय श्रीगुरुचरित्र या सद्ग्रंथाकडे जातं. कारण यातला प्रत्येक अध्याय गुरुपादुका माहात्म्याचा उद्घोष करतो. गुरुपादुका पूजन हे मूर्तिपूजनाएवढेच किंबहुना त्याहीपेक्षा श्रेष्ठ आहे हे नोंदवण्याचं, समाजमनावर गोंदवण्याचं आणि त्यायोगे समाजाने अंगिकारण्याचं महत्त्वपूर्ण कार्य श्रीगुरुचरित्र या ग्रंथाने केलं आहे.

**वाचनाची पथ्ये :**

आजवर हजारो-लाखो भक्तांनी या ग्रंथाचं श्रद्धायुक्त पठण केल्यामुळे यातला प्रत्येक शब्द, प्रत्येक अक्षर, प्रत्येक ओवी मंत्ररूप झालेली आहे किंबहुना सबंध श्रीगुरुचरित्र हाच एक मंत्ररूप ग्रंथ आहे. या मंत्ररूप ग्रंथाचं समूहाने पठण केलं तर त्यातून निर्माण होणारी शक्ती कित्येक पटीने गुणाकाराने वर्धित झालेली असेल आणि या शक्तीचा सदुपयोग पठण करणाऱ्या भक्ताला होईल हे निश्चित आहे. श्रीगुरुचरित्रातलं हे अलौकिक सामर्थ्य, त्यातली शक्ती, सक्षमतेने ग्रहण करण्यासाठी भक्तांनी वाचन आणि विचारांची काही पथ्यं पाळणं आवश्यक आहे. या पथ्यांचा उल्लेख श्रीगुरुचरित्रातही आढळतो. यातलं पहिलं पथ्य आहे 'एकाग्रता.' सर्व दैनंदिन अडचणी, मनातले सर्व विचार दूर सारून, एकचित्त होऊन, सर्व इंद्रियं एकवटून हा ग्रंथ वाचावा. प्रत्येक विचार हा त्या त्या प्रमाणात शक्तिव्यय घडवत असतो. श्रीगुरुचरित्रातलं शक्तिसामर्थ्याचं ग्रहण करायचं असेल, तर निदान पठणावेळी तरी मनाचं संपूर्ण मौन भक्ताला साधता आलं पाहिजे.

दुसरं महत्त्वाचं पथ्य म्हणजे भक्तिभाव. अत्यंत प्रसन्न चित्ताने आणि भक्तिपूर्ण मनाने श्रीगुरुचरित्र वाचावं, अन्यथा ते वाचन म्हणजे नुसताच वाचेचा व्यायाम ठरण्याचा संभव असतो. तिसरा आहे मनाचा संयम. श्रीगुरुचरित्रातील उल्लेखाप्रमाणे सायंदेव हा उत्तम गुरुभक्त असूनही गुरुआज्ञापालनात काही वेळेस कमी पडलेला अथवा त्याने श्रीगुरुंना सत्य पूर्ण विदित न केलेले आढळले. थोडक्यात त्याचा स्वतःच्या स्वार्थावरचा संयम त्या त्या प्रमाणात सुटला, ज्यामुळे त्या त्या वेळी गुरुआज्ञापालन शंभर टक्के घडू शकलं नाही. त्यातूनही तो तरून गेला ते श्रीगुरुंच्या कृपेमुळे. यातून घ्यावयाचा बोध एवढाच की गुरुभक्ताकडे आपल्या स्वार्थावर संयम साधण्याची पराकोटीची क्षमता हवी. पुढचं महत्त्वाचं पथ्य म्हणजे सेवाभाव.

आपल्याला खरोखर भक्तशिरोमणी व्हायचं असेल, गुरुतत्त्वाशी एकरूप व्हायचं असेल तर स्वतःमध्ये निःस्वार्थ सेवाभाव बाणवता यायला हवा. निस्सीम भक्ती, निःस्वार्थ सेवाभाव, गुरुआज्ञेचं तंतोतंत पालन या गोष्टींसह श्रीगुरुचरित्राचं पठण केलं असेल आणि भक्ताच्या कर्मनियमांनी अनुमती दिली तर त्याला गुरुचरणाची प्राप्ती एकाच जन्मात निश्चितपणे होईल. सर्वात महत्त्वाचं आहे ते आत्मशोधन. प्रत्येक गुरुभक्ताने वारंवार आत्मशोधन करणं आवश्यक आहे. सततच्या आत्मचिंतनातूनच स्वतःमधल्या उणीवांची जाणीव होत असते आणि गुरुतत्त्वाची, त्याच्या कृपेची ओळख पटत असते.

ही सगळी पथ्यं न पाळता वर्षानुवर्षं श्रीगुरुचरित्राची अनेक पारायणं जरी केली तरी त्याचा काही उपयोग नाही. गुरुआज्ञेचं पालन करायचं नाही, आत्मशोधन करायचं नाही, सद्गुरुंसमोर लपवाछपवी करायची आणि मग वर्षातले काही दिवस श्रीगुरुचरित्र वाचून फळाची अपेक्षा करायची! याने काहीच प्राप्त होऊ शकत नाही. मुळात गुरुकृपेच्या प्राप्तीसाठी साधकाकडे प्रचंड धैर्य पाहिजे. 'वाट्टेल ते संकट आलं तरी चालेल पण माझ्या सद्गुरुंनी दिलेल्या आज्ञेचा मी कधीही भंग करणार नाही' असं ठाम राहण्याइतकी मनाची ताकद गुरुभक्ताकडे पाहिजे. कदाचित एकदा पारायण करून या सगळ्या गोष्टींचा बोध साधकाला होणार नाही, म्हणून पुन्हा पुन्हा ते वाचलं पाहिजे.

जेवढी आवर्तनं तेवढं शब्द सामर्थ्य, अक्षर सामर्थ्य, वाक्यसामर्थ्य, ओवीसामर्थ्य, अध्यायसामर्थ्य वातावरणात निर्माण होईल, ज्याची मदत साधकाला होऊ शकेल. साधकाने स्वतः निर्माण केलेल्या वातावरणातल्या शुभकंपनांना यापूर्वी निर्माण झालेल्या लाखो शुभकंपनांची जोड मिळून त्यायोगे साधकाच्या जीवनात आमुलाग्र बदल घडू शकेल. केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी श्रीगुरुचरित्र न वाचता एकत्र येऊन, अनेक लोकांना एकत्र आणून एखाद्या चांगल्या स्थानावर सद्हेतूने ह्या सद्ग्रंथाचं पठण करा, गुरुभक्ताचे सर्व गुण स्वतःमध्ये बाणवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा हा श्रीगुरुचरित्रपठणामागचा खरा उपक्रम आहे.

◆◆◆

**प.पू. सद्गुरु श्री. बापट गुरुजींच्या आध्यात्मिक कार्याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी www.yadnya.in या संकेत स्थळाला भेट द्या.**